महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ १७ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २३२ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### अतिक्रमणमुक्त रेल्वे हद्द कायद्याची गरज; पण माणुसकीचीही कसोटी

टिटवाळा परिसरात रेल्वे प्रशासनाने केलेली अतिक्रमण हटाव मोहीम ही कायद्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने आवश्यक आणि अपरिहार्य आहे, याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. रेल्वे मार्गांच्या सुरक्षिततेशी तडजोड होऊ नये, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण व्हावे आणि भविष्यात अपघातांचा धोका टळावा, या उद्देशाने अशी कारवाई करणे प्रशासनाचे कर्तव्यच आहे. मात्र, अशा धडक मोहिमांच्या वेळी समाज म्हणून आपल्याला केवळ कायद्याचा चेहरा नव्हे, तर त्यामागची मानवी बाजूही तितक्याच गांभीर्याने पाहावी लागते.

रेल्वे हद्दीत उभारलेली अतिक्रमणे ही बहुतांश वेळा ऐषआरामासाठी नव्हे, तर पोटापाण्यासाठी किंवा डोक्यावर छप्पर मिळावे म्हणून उभी राहिलेली असतात. वर्षानुवर्षे छोट्या दुकानांतून उदरनिर्वाह करणारे फेरीवाले, मजूरवर्ग किंवा आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबे अचानक एका सकाळी बेघर होतात, तेव्हा कायद्याच्या चौकटीत योग्य असलेली कारवाई भावनिकदृष्ट्या वेदनादायक ठरते. टिटवाळ्यातील पाडकामावेळी उमटलेल्या प्रतिक्रिया याच वास्तवाची साक्ष देतात. प्रशासनाने नोटिसा दिल्या, मुदत दिली आणि नंतर कारवाई केली, हे प्रक्रियात्मकदृष्ट्या योग्यच आहे. मात्र, प्रश्न असा उरतो की नोटीसनंतर पर्याय काय? पुनर्वसनाची दिशा, पर्यायी जागा, किंवा किमान रोजगाराचा काही आधार देण्याची जबाबदारी कोणाची? अतिक्रमण हटवणे म्हणजे समस्या संपवणे नव्हे, तर ती दुसरीकडे ढकलणे ठरू नये. दुसरीकडे, अशा कारवाईमुळे एक महत्त्वाचा संदेशही जातो—रेल्वेची जमीन ही कुणाची खासगी मालमत्ता नाही आणि कायदा सर्वांसाठी सारखाच आहे. जर आज कठोर भूमिका घेतली नाही, तर उद्या अतिक्रमणांचे जाळे अधिक वाढेल आणि त्याची किंमत सामान्य प्रवाशांना सुरक्षिततेच्या दृष्टीने मोजावी लागेल. त्यामुळे 'कायदा हवा की माणुसकी?' हा प्रश्न मुळात चुकीचा आहे; खरा प्रश्न आहे—दोन्हींचा समतोल कसा साधायचा?

भविष्यात अशा मोहिमा राबविताना प्रशासनाने केवळ बुलडोझर नव्हे, तर धोरणात्मक दृष्टीही सोबत ठेवणे गरजेचे आहे. नियोजनबद्ध पुनर्वसन, स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग, आणि गरजूंसाठी पर्यायी व्यवस्था केल्यास अतिक्रमणमुक्तीची प्रक्रिया अधिक मानवी आणि स्वीकारार्ह होऊ शकते. अन्यथा, प्रत्येक पाडकामानंतर उरलेले ढिगारे केवळ विटा-भिंतींचे नसतात; त्याखाली दबलेली असते अनेकांची स्वप्ने, भीती आणि उद्याची अनिश्चितता.

# अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना सरकारचा दणका
## ■ नव्याने अर्ज सादर करण्याचे आदेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

महाराष्ट्राचे कार्यक्षम उपमुख्यमंत्री, कामाचा माणूस, आपले दादा अशी ओळख असलेल्या अजित पवारांचं २८ जानेवारीला विमान अपघातात निधन झालं. संपूर्ण महाराष्ट्र या घटनेमुळे शोकाकुल झाला. अजित पवारांच्या निधनाच्या दिवशीच त्यांनी थांबवून ठेवलेल्या काही फाइल्सवर दुपारी ४ वाजता सह्या करण्यात आल्या आणि ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जाचं प्रमाणपत्र वाटप करण्यात आलं. या घटनेची माहिती समोर येताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. तसंच या प्रमाणपत्रांना स्थगिती देण्यात आल्याचा निर्णय घेतला आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

२८ जानेवारीला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला अपघात झाला. विमानात अजित पवारांसह उपस्थित असलेल्या सगळ्यांचा या अपघातात मृत्यू झाला. या घटनेला काही तास उलटत नाहीत तोच मंत्रालयात वेगाने चक्रं फिरली आणि २० संस्थांच्या ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जाचं प्रमाणपत्र देण्यात आलं. अल्पसंखअयाक विभागाकडून अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र



देणं अपेक्षित होतं. मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी ही मंजुरी दिली. विशेष बाब म्हणजे १२ ऑक्टोबर २०२५ ला माणिकराव कोकाटेंनी या प्रमाणपत्र वाटपाला स्थगिती दिली होती. कोकाटेंना मंत्रिपद सोडावं लागल्यानंतर हा विभाग अजित पवारांकडे होता. त्यांच्या निधनानंतर अवघ्या काही तासांतच मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी हा प्रताप केल्याचं समोर आलं.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात कोणताही राजकीय दबाव किंवा भावनिक मुद्दा न आणता नियम, कायदे आणि प्रक्रिया यांनाच सर्वोच्च मानले आहे.**

------------------------

- नियमबाह्य निर्णय मान्य नाहीत – कोणत्याही परिस्थितीत कायद्याला बगल देता येणार नाही.
- प्रशासन जबाबदार आहे –अधिकाऱ्यांनी दिलेल्या मंजुरीची सखोल चौकशी होईल.
- तात्काळ स्थगिती – संशयास्पद पद्धतीने दिलेली प्रमाणपत्रे तात्पुरती थांबविण्याचा निर्णय.
- दोषी आढळल्यास कारवाई – अधिकारी असोत किंवा इतर कुणीही, नियमभंग केल्यास कठोर कारवाई होईल.

**●मुख्यमंत्री**

### विरोधक आक्रमक

**अजित पवार यांच्या निधनानंतर राज्य सरकारने तीन दिवसांचा शासकीय दुःखवटा जाहीर केला होता. राज्यात शासकीय दुखवट्याचे वातावरण असतानाच अल्पसंख्याक विभागाकडून अवघ्या चार दिवसांत तब्बल ७५ शिक्षण संस्थांना अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणावरुन विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.**

# वैतरणा नदीतील पाणी उपशामुळे वाड्यातील शेतजमीन संकटात

### पालकमंत्र्यांकडून हिंदुस्थान कोका-कोला'च्या चौकशीचे आदेश

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

**वाडा :** वाडा तालुक्यातील गांधरे येथील शेतकरी किरण विनायक ठाकरे यांच्या शेतीच्या नुकसानप्रकरणी सोमवारी पालघर येथे झालेल्या जनता दरबारात पालकमंत्री गणेश नाईक यांनी गंभीर दखल घेतली. वैतरणा नदीवरील बंधाऱ्यावर कुडूस येथील हिंदुस्थान कोका-कोला बेव्हरेजेस प्रा. लि. कंपनीकडून करण्यात येणाऱ्या पाणी उपशाच्या कामाची सखोल चौकशी करण्याचे आदेश देत, कंपनीच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्याच्या शेतीचे नुकसान होत असल्यास नियमबाह्य बाबींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पाटबंधारे विभागाला तातडीने संयुक्त पाहणी करण्यास सांगण्यात आले आहे.

कुडूस येथील शीतपेय निर्मिती करणाऱ्या हिंदुस्थान कोका-कोला बेव्हरेजेस प्रा. लि. कंपनीकडून वैतरणा नदीवरील बंधाऱ्याच्या पात्रातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपसा केला जात आहे. पाणी अडविण्यासाठी बंधाऱ्यावर बसविण्यात आलेल्या वाढीव प्लेटमुळे नदीचा नैसर्गिक प्रवाह बदलल्याचा आरोप आहे. याचा थेट परिणाम शेतकरी किरण ठाकरे यांच्या नदीलगत असलेल्या सर्वे क्रमांक ८६/१/अ या २.९७ हेक्टर क्षेत्राच्या शेतजमिनीवर झाला असून, या जमिनीत सातत्याने पाणी साचत आहे. परिणामी शेती हळूहळू नापीक होत चालली आहे.

पूर्वी या शेतजमिनीत पावसाळ्यात भातशेती तर हिवाळा आणि उन्हाळ्यात भाजीपाला व इतर पिकांचे उत्पादन घेतले जात होते. मात्र गेल्या काही वर्षांपासून उत्पादनात मोठी घट झाली असून शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान वाढत चालले आहे. या संदर्भात ठाकरे यांनी २०१९ पासून विविध शासकीय विभागांकडे सातत्याने तक्रारी दाखल केल्या आहेत. सदर बंधारा ठाणे पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत येतो. यापूर्वी उपअभियंता (पाटबंधारे) यांनी प्रत्यक्ष पाहणी करून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केलेल्या अहवालात, हिंदुस्थान कोका-कोला बेव्हरेजेस प्रा. लि. कंपनीकडून सीएसआर निधीतून शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याची शिफारस करण्यात आली होती. तसेच पाणी उपशासाठी आवश्यक संरक्षक उपाययोजना करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या होत्या. मात्र या शिफारशींवर अद्याप कोणतीही ठोस अंमलबजावणी झालेली नाही. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कंपनीकडून मोठ्या प्रमाणात पाणी उपसा केला जात असून पर्यावरणीय नियम व तांत्रिक निकषांचे काटेकोर पालन होत नसल्याची शंका व्यक्त होत आहे. योग्य निचऱ्याची व्यवस्था नसल्याने शेतकऱ्यांना सातत्याने फटका बसत आहे.

दरम्यान, पालकमंत्र्यांच्या निर्देशांनंतरही प्रदूषण नियंत्रण मंडळाने ही बाब पाटबंधारे विभागाशी संबंधित असल्याचे सांगत तक्रार पुढे पाठवली आहे. त्यामुळे विविध विभागांमध्ये आवश्यक समन्वयाचा अभाव असल्याचे चित्र स्पष्ट झाले असून, शेतकऱ्याला न्याय कधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भिवंडी महापालिकेत महापौर पदासाठी दहा; तर उपमहापौर पदासाठी ७ उमेदवारी अर्ज दाखल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठी येत्या २० फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. महापौर पदासाठी विविध पक्ष व आघाड्यांकडून १०, तर उपमहापौर पदासाठी ७ उमेदवारी अर्ज दाखल झाल्याची माहिती प्रभारी नगरसचिव अजय पाटील यांनी दिली.





महापौर पदासाठी शिवसेना, भाजप, काँग्रेस, समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, कोणार्क विकास आघाडी, भिवंडी विकास आघाडी व अपक्ष उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. उपमहापौर पदासाठीही प्रमुख पक्षांमध्ये चुरस निर्माण झाली आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दिवशी महापालिका मुख्य इमारतीत मोठी गर्दी झाली होती. माजी महापौर विलास पाटील यांना आर्थिक गुन्हे शाखेच्या ताब्यातून विशेष पोलीस बंदोबस्तात अर्ज दाखल करण्यासाठी आणण्यात आल्याने परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक होऊन महिना उलटूनही महापौर व उपमहापौर निवड न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी होती. मात्र कोकण आयुक्तांच्या आदेशानुसार ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य सभागृहात ही निवडणूक पार पडणार असून, महापालिकेतील सत्तासमीकरणांकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.







# कल्याण–डोंबिवलीत फेरीवाल्यांवर कारवाईला गती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६ ● कल्याण :**

कल्याण–डोंबिवली रेल्वे स्थानक परिसरातील फेरीवाल्यांमुळे निर्माण झालेल्या अडचणींवर आता ठोस पावले उचलली जात असून, या विषयाला विधीमंडळात वाचा फुटल्यानंतर पालिका प्रशासन अधिक सक्रिय झाले आहे. भाजपच्या कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड यांनी नागरिकांच्या सुरक्षितता व वाहतुकीच्या दृष्टीने हा मुद्दा सभागृहात उपस्थित केल्यामुळे प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत.

डोंबिवली व कल्याण रेल्वे स्थानक परिसर, तसेच अंतर्गत वर्दळीचे रस्ते व पदपथांवर अनधिकृतपणे बसलेल्या फेरीवाल्यांमुळे पादचाऱ्यांना चालणे कठीण होत असल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. याची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रश्नावर सविस्तर उत्तर देण्याची मागणी केली असून, त्यामुळे पालिका यंत्रणा अधिक सतर्क झाली आहे.

या पार्श्वभूमीवर, महापालिकेच्या आयुक्तांनी दहा प्रभागांतील सहाय्यक आयुक्तांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील फेरीवाल्यांवर करण्यात आलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे अतिक्रमण नियंत्रणाची प्रक्रिया अधिक पारदर्शक व परिणामकारक होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा पालिका प्रशासनाकडून समन्वयाने कारवाई राबवून रेल्वे स्थानक परिसरातील पदपथ व रस्ते मोकळे करण्यावर भर देण्यात येणार आहे. या सकारात्मक पावलांमुळे येत्या काळात कल्याण–डोंबिवली परिसरात पादचाऱ्यांना दिलासा मिळेल, तसेच वाहतुकीची शिस्त सुधारेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मध्य रेल्वेवरील १० स्थानकांवर आपत्कालीन वैद्यकीय कक्ष

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

मुंबई : मुंबईकरांची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या लोकल रेल्वेने दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. प्रचंड गर्दीमुळे लोकलमधून पडणे, गाडीत चढताना किंवा उतरताना होणारे अपघात हे नेहमीचेच झाले असून अशा घटनांमध्ये जखमी प्रवाशांना वेळीच वैद्यकीय उपचार मिळणे अत्यंत गरजेचे असते. ही गरज लक्षात घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

लोकल तसेच इतर प्रवासी गाड्यांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आपत्कालीन वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी मध्य रेल्वेवरील १० उपनगरीय स्थानकांवर लवकरच आपत्कालीन वैद्यकीय कक्ष (ईएमआर) उभारण्यात येणार आहेत. या कक्षांमुळे अपघात, अचानक आजार किंवा आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांना तातडीची मदत मिळणार आहे.

सध्या मध्य रेल्वेवरील अंदाजे ९० स्थानकांपैकी केवळ ५ ते ६ स्थानकांवरच ईएमआर सेवा उपलब्ध आहे. तर पश्चिम रेल्वेवरील ३० उपनगरीय स्थानकांपैकी फक्त १४ ते १५ स्थानकांवर ही सुविधा आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रवासी संख्या असतानाही बहुतांश स्थानकांवर आपत्कालीन वैद्यकीय यंत्रणा नसल्याचे वास्तव समोर आले आहे.

नवीन ईएमआर कक्ष उभारल्याने लोकल अपघातांमध्ये जखमी झालेल्या प्रवाशांना रुग्णालयात हलवण्यापूर्वीच प्राथमिक उपचार मिळणार असून, जीवितहानी टाळण्यास मदत होणार आहे. मात्र, अपघातांचे प्रमाण लक्षात घेता ही सुविधा केवळ काही निवडक स्थानकांपुरती न ठेवता सर्वच उपनगरीय स्थानकांवर तातडीने लागू करण्याची मागणी प्रवासी संघटनांकडून होत आहे.

### आणखी ८ स्थानकांसाठी प्रस्ताव

**मध्य रेल्वेवरील १० स्थानकांव्यतिरिक्त, कसारा, दादर, डोंबिवली, सायन, विक्रोळी, भांडुप, दिवा आणि इगतपुरी यासारख्या ८ गर्दीच्या स्थानकांवर ई-लिलाव प्रक्रिया सुरू करण्याचा प्रस्ताव करण्यात आला आहे. यामुळे स्थानिक प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल, असे रेल्वे तज्ज्ञ आणि कार्यकर्ते समीर झवेरी यांनी सांगितले.**

# मुलुंड दुर्घटनेनंतर 'एमएमआरडीए'ला जाग
## सुरक्षा तपासणी करण्यासाठी दोन पथके
## कल्याण-डोंबिवली, भिवंडीतील कामांवरही प्रश्नचिन्ह

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

**मुंबई : मुलुंड येथील लालबहादूर शास्त्री मार्गावर वडाळा-कासारवडवली मेट्रो-४ मार्गिकेच्या कठड्याचा भाग कोसळून झालेल्या गंभीर दुर्घटनेनंतर एमएमआरडीए अखेर खडबडून जागी झाली आहे. या घटनेनंतर मेट्रो-४ मार्गिकेची सुरक्षा तपासणी करण्यासाठी दोन पथके नेमण्यात आली असून रविवारपासून खांब, तुळया, कठडे व इतर बांधकाम घटकांची पाहणी सुरू करण्यात आली आहे.**





मात्र ही तपासणी दुर्घटनेनंतरच सुरू झाल्याने 'अपघात झाल्यावरच जाग येते का?' असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. मेट्रो प्रकल्पांच्या कामात सातत्याने होणाऱ्या निष्काळजीपणावर यामुळे पुन्हा एकदा बोट ठेवले जात आहे. विशेष म्हणजे, कल्याण-डोंबिवली आणि भिवंडी परिसरात सध्या नव्याने सुरू असलेल्या मेट्रो कामांकडेही नागरिकांचे लक्ष वेधले गेले आहे. या भागांत मोठ्या प्रमाणावर खांब उभारणी, तुळया टाकण्याची कामे सुरू असताना सुरक्षेचे निकष कितपत पाळले जात आहेत, याबाबत शंका व्यक्त होत आहेत. मुलुंडसारखी घटना पुन्हा घडू नये, यासाठी या मार्गिकांवरही तातडीने आणि स्वतंत्रपणे सुरक्षा ऑडिट करण्याची मागणी जोर धरत आहे.

मेट्रो प्रकल्पांमुळे वाहतूक कोंडी, धुळ-प्रदूषण आणि जीविताला धोका निर्माण होत असताना, प्रशासन केवळ दुर्घटनेनंतर तपासणी करून जबाबदारी झटकत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. तपासणी अहवाल केवळ कागदापुरता न राहता, दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर ठोस कारवाई होणार का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.




## वाचक मनोगत

# क्रांतिकारकांचे गुरु वस्ताद लहुजी साळवे

आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रगाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करताना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## कायदेशीर आक्षेपांमुळे नवी मुंबईतील

# स्वीकृत नगरसेवक निवड लांबणीवर ?

### अर्जातील अटी शासन निर्णयाशी विसंगत असल्याचा आरोप

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका यांच्या स्वीकृत (नामनिर्देशित) सदस्य नियुक्ती प्रक्रियेवर गंभीर कायदेशीर आक्षेप नोंदविण्यात आल्याने महापालिका प्रशासन अडचणीत सापडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सचिव विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यात उमेदवारांना विविध राजकीय पक्षांच्या गटनेत्यांकडून शिफारसपत्र किंवा शपथपत्र सादर करण्याची अट घालण्यात आली असून, ही अट महाराष्ट्र शासनाच्या २८ फेब्रुवारी २०१२ च्या शासन निर्णयाशी विसंगत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सजग नागरिक मंच तसेच सामाजिक कार्यकर्ते सुनील चौधरी यांनी याबाबत स्पष्ट आक्षेप नोंदवला असून, संबंधित शासन निर्णयातील नियम ५ नुसार स्वीकृत सदस्यांची शिफारस करण्याचा संपूर्ण अधिकार आयुक्तांकडे असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. नियमानुसार आयुक्तांनी सभागृह नेते, विरोधी पक्षनेते व नोंदणीकृत गटनेत्यांशी विचारविनिमय करून सभागृहातील तौलनिक संख्याबळाच्या आधारे पात्र व्यक्तींची नावे निश्चित करणे अपेक्षित आहे. मात्र, सध्याच्या प्रक्रियेत उमेदवारांकडून आधीच शपथपत्रे व शिफारसपत्रे मागविण्यात येत असल्याने आयुक्तांच्या अधिकारावर गदा येत असून, ही संपूर्ण प्रक्रिया नियमबाह्य ठरत असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे भविष्यात या नियुक्त्यांवर न्यायालयीन आव्हान उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीतीही व्यक्त करण्यात येत आहे. या संदर्भात आयुक्तांना सविस्तर पत्र देऊन विद्यमान अर्ज नमुना तत्काळ रद्द करून कायदेशीर तरतुदींशी सुसंगत सुधारित अर्ज नमुना लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा तांत्रिक व प्रशासकीय चुका टाळण्यासाठी संबंधित विभागाला स्पष्ट सूचना देण्यात याव्यात, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

या तक्रारीनंतर महापालिका प्रशासन ही प्रक्रिया तात्पुरती स्थगित करून त्यामध्ये सुधारणा करणार का, याकडे राजकीय वर्तुळासह नागरीकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या कायदेशीर आक्षेपामुळे स्वीकृत सदस्य नियुक्तीचा निर्णय लांबणीवर पडण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे.

# ठाणे पोलिस कर्मचाऱ्याला 84 हजारांचा सायबर गंडा

**ठाणे, ता. १५ :** ठाणे शहर पोलिस दलातील कर्मचाऱ्यालाच सायबर गुन्हेगारांने गंडा घातल्याचे समोर आले आहे. पोलिस कर्मचाऱ्याचे ई-मेल व मोबाईल हॅक करून सायबर गुन्हेगाराने ऑनलाईन कर्ज काढत तब्बल ८४ हजार ३०० रुपयांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी कळवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सायबर पोलिसांकडून तपास सुरू आहे.

कळवा येथील श्रीवाजेद गुलाब आत्तार (वय ३५) २०१७ पासून ठाणे शहर पोलिस दलात कार्यरत असून सध्या परिमंडळ -१ पोलिस उपायुक्त कार्यालय प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. १० फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ८.३० वाजता घरी गेल्यानंतर त्यांच्या मोबाईलवर एचडीएफसी बँकेकडून आयएमपीएस व्यवहाराचे दोन संदेश प्राप्त झाले. त्यामध्ये ५० हजार व २८ हजार रुपये खात्यातून वळते झाल्याचे नमूद होते. यानंतर त्यांनी दुसऱ्या दिवशी तलावपाळी येथील एचडीएफसी बँक शाखेत चौकशी केली असता, २७ जानेवारी २०२६ रोजी अनोळखी व्यक्तीने त्यांचा मोबाईल व ई-मेल हॅक करून त्यांच्या नावावर ऑनलाईन कर्ज घेतल्याचे समोर आले. तर, खात्यातील उर्वरित ११ हजार ३०० रुपये देखील वापरण्यात आले. तर चोरट्याने ई-मेल आयडीचा वापर करून हॅकिंग केल्याचे दिसून आले. या प्रकरणी सायबर गुन्हेगाराविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# शिमगोत्सवासाठी ठाणे एसटी विभाग सज्ज जिल्ह्यातून 75 जादा गाड्यांचे नियोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे, ता. १६ : गणेशोत्सवानंतर शिमगोत्सवासाठी चाकरमानी हे आपल्या गावी जातात. त्यामुळे नेहमीच या चाकरमान्यांना सुखरूप सोडण्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे ठाणे विभाग दरवर्षीप्रमाणे यंदाही सज्ज झाले. या वेळी तब्बल ७५ जादा गाड्या सोडण्याचे नियोजन केले. २८ फेब्रुवारीपासून या गाड्यांचे आरक्षण सुरू होणार असून, कोकणातील विविध प्रमुख मार्गावर या गाड्या धावणार आहेत.

अवघ्या काही दिवसांवर आलेल्या होळीचा पारंपरिक शिमगोत्सव कोकणात मोठ्या उत्साहात साजरा होतो. या शिमगोत्सवासाठी मुंबई, ठाणे आणि परिसरात नोकरी-व्यवसायानिमित्त स्थायिक झालेला कोकणी माणूस कोकणात जातो. विशेषतः होळीच्या काळात देवाची पालखी नाचवणे, ग्रामदैवतांची पूजा, पारंपरिक खेळ, फागोत्सव आणि सामाजिक एकोपा अनुभवण्यासाठी कोकणी माणूस आवर्जून गाव गाठतो. अशा चाकरमान्यांना नेण्यासाठी ठाणे एसटी सज्ज झाली आहे.

मार्च महिन्याच्या २ तारखेला होळी, तर ३ ला धुळवड आहे. यानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने यंदाही विशेष नियोजन केले आहे. ठाणे एसटी विभागाच्या विविध आगारांतून कोकणातील दापोली, खेड, चिपळूण, गुहागर आणि रायगड जिल्ह्यातील महाड या प्रमुख ठिकाणांसाठी नियमित बससेवेव्यतिरिक्त एकूण ७५ जादा एसटी बस सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, बससेवेच्या आगाऊ तिकीट बुकिंगची सुविधा संगणकीय (ऑनलाइन) आणि ऑफलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आली असून, बुकिंगची प्रक्रिया २८ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत सुरू राहणार आहे. याशिवाय गटाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी ग्रुप बुकिंगची स्वतंत्र सोयही करण्यात आली आहे.

# ‘माझी वसुंधरा’ अभियानांतर्गत ठाण्यात पर्यावरण जनजागृती स्पर्धा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका मार्फत माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरण जनजागृती व हरित शपथ स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ठाणे महानगरपालिका हद्दीतील स्वयंसेवी संस्था, महाविद्यालये तसेच ठामपा व खाजगी शाळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जागृती निर्माण करणे, लोकसहभाग वाढविणे तसेच नाविन्यपूर्ण पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे. ही स्पर्धा दोन टप्प्यांत होणार असून प्रथम टप्प्यासाठी २५ मार्च २०२६ पर्यंत आणि द्वितीय टप्प्यासाठी २० ऑगस्ट २०२६ पर्यंत माहिती ऑनलाईन सादर करावी लागणार आहे. स्पर्धेचा निकाल ७ सप्टेंबर २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिनानिमित्त जाहीर केला जाणार आहे.

**■ स्पर्धेचे गट व स्तर**

स्पर्धेत चार गटांचा समावेश असून स्वयंसेवी संस्थांसाठी महापालिका स्तरावर, महाविद्यालयांसाठी परिमंडळ स्तरावर, तर ठामपा व खाजगी शाळांसाठी प्रभाग समिती स्तरावर स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

**■ सहभागासाठी अटी**

स्वयंसेवी संस्थांना रील/डॉक्युमेंटरी निर्मिती व हरित शपथ या दोन्ही प्रकारांत सहभाग बंधनकारक असून प्रत्येक टप्प्यात किमान पाच विषयांवरील व्हिडिओ सादर करणे आवश्यक आहे. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांमधून किमान १० टक्के किंवा २०० ‘पर्यावरण दूत’ निवडून विविध पर्यावरणपूरक उपक्रम राबवायचे आहेत. शाळांनी किमान एक ते पाच जनजागृती कार्यक्रम आयोजित करून त्यांची जीओ-टॅग छायाचित्रे व सोशल मीडिया लिंक सादर करणे आवश्यक राहणार आहे.

हरित शपथ नोंदणी राज्य शासनाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने करावी लागणार असून ULB मध्ये “Thane Municipal Corporation” निवडणे बंधनकारक आहे. शपथेनुसार कृती पूर्ण केल्यास स्वतंत्र गुण दिले जाणार आहेत.

**■ पारितोषिके**

स्वयंसेवी संस्थांसाठी प्रथम क्रमांकास रु. १ लाख, द्वितीय रु. ७५ हजार व तृतीय रु. ५० हजार अशी रोख पारितोषिके तसेच उत्तेजनार्थ पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. महाविद्यालये व शाळांसाठीही विविध स्तरांवर रोख पारितोषिकांची घोषणा करण्यात आली आहे. सहभागी संस्था/आस्थापनांनी दोन्ही टप्प्यांत स्वतंत्र माहिती ऑनलाईन सादर करणे आवश्यक असून गुणांकन स्वमूल्यांकन पद्धतीने करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष पाहणी करून अंतिम गुण निश्चित केले जातील. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नोंदणी लिंक ठाणे महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून अधिक माहितीसाठी www.thanecity.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा pcctmc.ho@gmail.com

या ई-मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

# भारतीय संघाचा ‘सुपर एट’ फेरीत प्रवेश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पुरुषांच्या ट्वेन्टी20 विश्वचषकाच्या साखळी फेरीत भारतानं पाकिस्तानचा 61 धावांनी पराभव केला. कोलंबोमध्ये झालेल्या सामन्यात भारतानं प्रथम फलंदाजी करत पाकिस्तानसमोर विजयासाठी 176 धावांचं आव्हान ठेवलं. पण पाकिस्तानचा संपूर्ण संघ 114 धावांवर गारद झाला.**

रविवारी रात्री भारताने टी-२० वर्ल्ड कपमध्ये पाकिस्तानवर ६१ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासह भारतीय संघाने ‘सुपर एट’ फेरीत प्रवेश केला.

प्रथम फलंदाजी करताना भारताकडून ईशान किशननं जबाबदारी उचलली आणि पाकिस्तानच्या गोलंदाजांची अक्षरशः धुलाई केली. त्यानं 77 धावा केल्या. ईशान सामनावीरही ठरला. ईशानबरोबर तिलक, सूर्यकुमार आणि शिवम दुबेच्या फलंदाजीनं भारताला 7 बाद 175 धावांपर्यंत मजल मारता आली. पाकिस्तानतच्या साईम अयूबनं 3 विकेट घेतल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संपूर्ण संघ 114 धावांवर बाद झाल्याचं पाहायला मिळालं. पहिल्या दोन ओव्हरमध्येच पांड्या आणि बुमरानं पाकिस्तानचे आघाडीचे तीन फलंदाज तंबूत परतवले. होते. पाकिस्तानकडून उस्मान खानच्या 44 धावा वगळता कुणालाही फारशी चांगली कामगिरी करता आली नाही. पहिल्या चार फलंदाजांना तर दुहेरी धावसंख्याही गाठता आली नाही.

भारताकडून बुमरा, पांड्या, अक्षर आणि वरुण या चौघांनीही प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. तर कुलदीप आणि तिलक वर्माला प्रत्येकी एक विकेट मिळाली.

या विजयासह भारतानं विश्वचषकाच्या सुपर 8 फेरीतलं स्थान पक्कं केलं आहे. गुणतालिकेत भारत पहिल्या स्थानी आहे.

# आपण शिकलो तर आपली आणि समाजाची प्रगती होईल – मदन जाधव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**■ कुणाल म्हात्रे**



**कल्याण :** तरुण मुलांनी व मुलींनी शिक्षणाकडे जास्त लक्ष दिले पाहिजे आपण शिकलो तर आपली आणि समाजाची प्रगती होईल असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष मदन जाधव यांनी व्यक्त केले. कल्याण मध्ये संत सेवालाल महाराजांची 287 वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी जाधव बोलत होते.

संत सेवालाल महाराज यांची 287 वी जयंती कल्याण मध्ये मोठ्या आनंद व उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन सेवालाल महाराज रिक्षा चालक मालक संघटना तसेच समस्त बंजारा समाजाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मदन जाधव यांनी आपल्या भाषणात तरुण मुलांना मार्गदर्शन केले. तरुण मुलांनी शिक्षणाकडे जास्त लक्ष दिले पाहिजे शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. आपण जर शिकलो तर आपली प्रगती होईल पण शिकलो पाहिजे समाजाची प्रगती केली पाहिजे असे म्हणत मुलांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाला कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे नगरसेवक जयवंत भोईर, वरूण पाटील, शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील, माजी नगरसेवक उल्हास भोईर, प्रशांत माळी, सीता नाईक, गणेश नाईक, शंकर चव्हाण, नवनाथ पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले होते. परिसरातील अनेक बालकांनी यामध्ये सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवालाल राठोड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता संभाजी जाधव, सुदाम राठोड, सुपडू राठोड, ज्ञानेश्वर जाधव, गोकुळ पवार, सुभाष चव्हाण, अरुण तोवर, संजय राठोड आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# कोकण खोरे विकास महामंडळा अंतर्गत सिंचन प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण करा - जलसंपदा मंत्री गिरीश महाजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**ठाणे,दि.15**

-----------------

**कोकण खोरे विकास महामंडळांतर्गत मान्यता झालेल्या सिंचन प्रकल्पांची कामे गतीने व विहीत कालावधी पूर्ण करण्यात यावीत, असे निर्देश जलसंपदा ( विदर्भ, तापी,कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी नुकतेच दिले.**



ठाणे येथील कोकण खोरे विकास महामंडळाच्या कार्यालयात मंत्री श्री.महाजन यांच्या अध्यक्षतेखाली दि.११ फेब्रुवारी रोजी झालेल्या नियामक मंडळाच्या बैठकीत कोकण पाटबंधारे महामंडळाच्या विविध कामांना मान्यता देण्यात आली.

या बैठकीस जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, कोकण खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले,विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक राजेश सोनटक्के, यासह विविध क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते. तसेच वित्त विभाग व नियोजन विभागाचे अधिकारी दुरदुष्यप्रणाली द्वारे सहभागी झाले होते.

याप्रसंगी विविध सिंचन प्रकल्पातील कामांचा मंत्री श्री. महाजन यांनी आढावा घेतला. ते म्हणाले, नियामक मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेल्या कामांमुळे सिंचन क्षेत्रात वाढ होत होणार असल्याने ही कामे गतीने व निर्धारित वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे. तसेच आर्थिक वर्षात प्राप्त झालेला निधी १०० टक्के खर्च होईल यासाठी देखील सर्व अधिकारी व यंत्रणांनी दक्षता घ्यावी असे निर्देश यावेळी मंत्री महाजन यांनी दिलेत.

यावेळी कोकण पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत देहरजी प्रकल्प, काळू प्रकल्प, बाळगंगा, हरिहरेश्वर प्रकल्प, पोशीर प्रकल्प, शेलार प्रकल्प आदींचा आढावा याप्रसंगी घेण्यात आला. मुंबई शहराला पाणीपुरवठा करणारा व महत्वकांक्षी ठरणाऱ्या योजनांचा कामांना गती देण्याचे देखील निर्देश यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी दिले. तसेच प्रशासकीय मान्यता झालेल्या प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

## भविष्यवेध



■ मंगळवार
17 फेब्रुवारी 2026

**मेष**
आज काही नवीन काम सुरू करण्यासाठी योग्य वेळेची वाट पहा. दिवस तुमच्यासाठी व्यस्त असेल. व्यवसायात नफा मिळविण्याची संधी असेल.

**वृषभ**
दिवस चांगला जाणार आहे. अनेक उत्तम रोजगाराच्या संधी आणि उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील, ज्यामुळे आर्थिक परिस्थिती मजबूत होईल.

**मिथुन**
जोडीदाराकडून प्रकल्पाच्या कामात पाठिंबा मिळेल, जो तुमच्या भविष्यातील यशासाठी उपयुक्त ठरेल. दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल.

**कर्क**
सहकाऱ्यांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवले तर भविष्यात ते तुम्हाला महत्त्वपूर्ण फायदे देतील. खर्चावर नियंत्रण ठेवणे आर्थिक परिस्थिती मजबूत होईल.

**सिंह**
जर तुम्ही आज काहीतरी नवीन सुरू करण्याचा विचार करत असाल तर हा एक शुभ दिवस आहे. दिवस तुमच्यासाठी चांगला राहणार आहे.

**कन्या**
उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण होतील आणि तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत होईल. ऑफिसमध्ये थोडे जास्त काम असेल, ज्यामुळे शारीरिक थकवा

**तुळ**
येऊ शकतो. तुमच्या पालकांकडून तुम्हाला आर्थिक मदत मिळेल. दिवस तुमच्यासाठी चांगला राहणार आहे. तुम्ही व्यवसायाच्या बाबींवर लक्ष केंद्रित

**वृश्चिक**
कराल आणि त्या पुढे नेण्यासाठी मदत घ्याल. जेव्हा तुम्ही तुमच्या चिंता वरिष्ठ अधिकाऱ्यासमोर मांडाल तेव्हा तुम्हाला सकारात्मक प्रतिसाद मिळेल.

**धनु**
आज तुम्ही एखाद्या धार्मिक कार्यक्रमाला उपस्थित राहाल आणि यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल. दिवस तुमच्यासाठी मिश्रित असेल.

**मकर**
कामावर तुम्ही चांगले काम कराल आणि तुमच्या सहकाऱ्यांकडून पूर्ण सहकार्य मिळेल. बांधकामाच्या कामात तुम्ही एखाद्या अनुभवीचा सल्ला घेऊ शकता.

**कुंभ**
ज्यामुळे तुमचे काम सोपे आणि सुरळीत होईल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला चांगली बातमी ऐकू येईल. वडिलांच्या आरोग्याची काळजी घ्यावी.

**मिन**
मोठ्यांचा सल्ला घ्या, तुम्हाला चांगला सल्ला मिळेल. भावनेच्या भरात आज कोणालाही वचन देऊ नका. आज फालतू खर्चापासून दूर राहून बजेट सांभाळा.





# रेल्वेच्या कारवाईत बेकायदा बांधकामे भुईसपाट

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** टिटवाळा परिसरातील रेल्वेच्या हद्दीत अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या बांधकामांवर आज रेल्वे प्रशासनाने निर्णायक कारवाई करत १९ अतिक्रमणे जमीनदोस्त केली. सकाळपासून सुरू झालेल्या या धडक तोडक मोहिमेमुळे परिसरात मोठी हालचाल निर्माण झाली असून नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे. मध्य रेल्वेच्या भूमी व्यवस्थापन विभागाच्या सूचनेनुसार अप लाईनजवळील कि.मी. ६३/५-१८ परिसरातील रेल्वे मालकीच्या जागेवर उभारलेली कच्ची-पक्की दुकाने आणि काही निवासी बांधकामांचे भाग अनधिकृत असल्याचे स्पष्ट झाले होते. संबंधितांना यापूर्वी लेखी नोटिसा देऊन ठराविक मुदत देण्यात आली होती; मात्र त्यानंतरही अतिक्रमण कायम राहिल्याने प्रशासनाने थेट पाडकामाची कारवाई हाती घेतली. कारवाईदरम्यान कायदा-सुव्यवस्था बिघडू नये म्हणून टिटवाळा पोलीस ठाण्याकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षकांसह मोठ्या संख्येने पुरुष व महिला पोलीस कर्मचारी तैनात होते. रेल्वे प्रशासन, स्थानिक पोलीस आणि रेल्वे पोलीस दल यांच्या समन्वयातून ही मोहीम सुरळीत पार पडली. मधुबन सोसायटीसमोरील रेल्वे पावर हाऊसजवळील रस्त्यालगतचा भाग असल्याने पाडकामाची कारवाई पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. काही ठिकाणी रहिवाशांमध्ये भावनिक प्रतिक्रिया उमटल्या; मात्र प्रशासनाने संयम राखत परिस्थिती नियंत्रणात ठेवली आणि कारवाई कोणताही अनुचित प्रकार न घडता पूर्ण केली. रेल्वे मार्गांच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ नये आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण व्हावे, या दृष्टीने अतिक्रमण हटविण्याची मोहीम सातत्याने राबविली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सूत्रांनी स्पष्ट केले. या कारवाईनंतर रेल्वेच्या जागेवर अनधिकृत बांधकामे उभारणाऱ्यांना स्पष्ट संदेश मिळाला असून, पुढील काळात अशा प्रकारांवर प्रशासन कठोर भूमिका घेणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण विभाग, कल्याण

### समग्र शिक्षा

**बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 नुसार आरक्षित 25% जागांवर मोफत ऑनलाईन शालेय प्रवेश**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 मधील कलम 12 (सी) (1) नुसार दुर्बल, वंचित, आर्थिक व सामाजिकदृष्टया मागास घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळा, (अल्पसंख्याक शाळा वगळून) शाळांमध्ये इयत्ता 1ली किंवा पूर्व प्राथमिक वर्ग शाळांनी निश्चित केलेल्या प्रवेशस्तर वर्गात बालकांसाठी आरक्षित 25% प्रवेश राखीव ठेवण्यात आलेले आहेत. सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षाकरिता आरक्षित 25% जागांवर मोफत ऑनलाईन शालेय प्रवेश प्रक्रीया राबविण्यात येत असून **इच्छूक अर्जदारांना महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या https://student.maharashtra.gov.in/adm portal/Users/rte index new या वेबसाईटवर दि. 17/02/2026 ते दि. 10/03/2026** कालावधीपर्यंत बालकांचे अर्ज भरण्यास पालकांना आवाहन करण्यात येत आहे.

**प्रवेशाचा वर्ग:- शाळेने निश्चित केलेला प्रवेशस्तर वर्ग**

- **सर्व मंडळाच्या शाळा - स्वयं अर्थसहाय्यित शाळा (State, CBSE, ICSE IGCSE), विना अनुदानित शाळा (अल्पसंख्याक शाळा वगळून) (पाल्याच्या निवासस्थानापासून १ किलोमिटर किंवा त्यापेक्षा कमी अंतरावरील शाळा)**
- **पात्र अर्जदार - सामाजिक वंचित घटक -** अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब-क-ड) (NT), इतर मागासवर्ग (OBC), विशेष मागास प्रवर्ग (SBC). आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय (SEBC), एच. आय. व्ही. बाधित/कोव्हीड प्रभावित बालके, अनाथ बालके
  **दुर्बल घटक -** एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेले घटक (उत्पन्नाचा दाखला अल्प उत्पन्नगट) **दिव्यांग घटक -** (४०% पेक्षा जास्त अपंगत्व), (जिल्हा शासकीय रुग्णालय यांचे प्रमाणपत्र)

**ऑनलाईन अर्ज भरताना पालकांनी शासनाने अनिवार्य केलेली आवश्यक कागदपत्रे साईटवर अपलोड करावी.**

- **सामाजिक वंचित घटकांसाठी जातीचा दाखला -** सक्षम प्राधिका-याने दिलेले वडीलांचे/बालकांचा जातीचा दाखला (परराज्यातील जातीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही)
- **आर्थिक दुर्बल घटकांसाठी उत्पन्नाचा दाखला -** सक्षम प्राधिका-याने दिलेले बालकाच्या पालकांचा उत्पनाचा दाखला (रुपये एक लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेबाबत प्रमाणपत्र सन २०२३-२४ किंवा २०२४-२०२५ या वर्षाचे)
- **दिव्यांग घटकांसाठी दिव्यांग प्रमाणपत्र** - सक्षम प्राधिका-याने दिलेले ४०% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र,
- **निवासी पुरावा -** स्वतःच्या मालकीची निवासी व्यवस्था असल्यास त्या निवासी पुराव्याकरिता रेशनिंग कार्ड, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, वीज देयक, टेलिफोन देयक, प्रॉपर्टी टॅक्स देयक, घरपटटी, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट व राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक यापैकी कोणताही एक पुरावा ग्राहय धरण्यात येईल. भाडे तत्वावर राहणा-या पालकांकरिता भाडेकरार हा मा. दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृतच असावा. भाडेकरार हा फॉर्म भरण्याच्या दिनांकाच्या पूर्वीचा असावा व त्याचा कालावधी ११ महिन्यांचा किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा असावा. ज्या ठिकाणाचा भाडेकरारनामा दिला असेल त्या ठिकाणी बालक/पालक राहत नाही असे आढळून आल्यास त्या पालकांविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.
- **जन्माच्या दाखल्यासाठी पुढीलपैकी एका दस्तऐवजाची प्रत -** ग्रामपंचायत/नपा/मनपा यांचा दाखला/रुग्णालयातील एएनएमच्या रजिस्टरमधील नोंदीचा दाखला, अंगणवाडी/बालवाडीतील रजिस्टरमधील दाखला/ पालकांचे प्रतिज्ञापत्र स्वयंनिवेदन
- **घटस्फोटित महिला / न्यायप्रविष्ट असलेल्या घटस्फोट प्रकरणातील महिलांसाठी -** न्यायालयाच्या निर्णय/प्रकरण न्यायप्रविष्ट असलेल्या महिलेचा अथवा बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा, बालक वंचित घटकातील असल्यास बालकाचे
- वडीलांचे जातीचे प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटकातील असल्यास बालकाच्या आईच्या उत्पन्नाचा दाखला
- **विधवा महिलांसाठी -** पतीचे मृत्यु प्रमाणपत्र, विधवा महिलेचा/बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा, वंचित घटकातील असल्यास बालकाच्या वडीलांचे जातीचे प्रमाणपत्र, आर्थिक दुर्बल घटकातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला.
- **अनाथ बालकांसाठी -** अनाथलयाची/बालसुधारगृहाची कागदपत्रे, जर अनाथ बालक अनाथलयात राहत नसेल तर संबंधित बालकाचे पालकत्व स्विकारलेल्या व्यक्तीचे प्रवेशासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे.
- **Covid प्रभावीत / एच.आय.व्ही. बाधित बालक -** COVID प्रभावामुळे ज्याचे पालक किंवा दोन्हीही यांचे निधन दि. ०१ एप्रिल २०२० ते दि. ३१ मार्च २०२२ या कालावधीत मृत्यु झाले शासकीय रुग्णालय यांचे मृत्यु प्रमाणपत्र

**अधिक माहितीसाठी संपर्क :- शिक्षण विभाग कार्यालय, झोजवाला शॉपिंग सेंटर पहिला मजला, रामदेव हॉटेलच्या मागे, सहजानंद चौक, कल्याण पश्चिम**

**जावक क्रमांक :**
**कडोंमपा/जसंवि/मुका/९३६**
**दिनांक : १६/०२/२०२६**

**Sd/-**
**(भारत बोरनारे)**
**प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग**
**कल्याण डोंबिवली महानगर पालिका**

**Sd/-**
**(प्रसाद बोरकर)**
**उपआयुक्त (शिक्षण)**
**कल्याण डोंबिवली महानगर पालिका**

# नायगाव स्थानकातील पादचारी पूल दीड महिना बंद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**वसई:** नायगाव स्थानातील फलाट क्रमांक एक, दोन आणि तीनला जोडणारा उत्तरेकडील जुना पादचारी पूल १४ फेब्रुवारीपासून प्रवाशांसाठी बंद करण्यात आला आहे. देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी हा पूल तब्बल दीड महिना बंद ठेवण्यात येणार असल्याचे पश्चिम रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. पश्चिम रेल्वेकडून वसई, विरार, नालासोपारा आणि नायगाव रेल्वे स्थानकांच्या आधुनिकीकरणासाठी विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. यात रेल्वे स्थानकांमध्ये एलिव्हेटेड डेक बांधणे, पादचारी पूल आणि जिन्यांची दुरुस्ती करणे अशी विविध कामे केली जात आहेत. तर नायगाव रेल्वे स्थानकातील एक, दोन आणि तीन या फलाटांना जोडणारा उत्तरेकडील जुना पादचारी पूल आणि आणि जिने प्रवाशांसाठी शनिवार, १४ फेब्रुवारीपासून बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती पश्चिम रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

पुलाच्या विस्तार आणि नूतनीकरणाच्या कामासाठी रेल्वे प्रशासनाने हा निर्णय घेतला असून, पुढील दीड महिना हा मार्ग वापरासाठी उपलब्ध नसणार आहे. सध्या नायगाव रेल्वे स्थानकात पादचारी पुलांची उंची वाढवणे आणि फलाटांच्या विस्तारीकरणाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. याच कामांचा भाग म्हणून उत्तरेकडील हा महत्त्वाचा पूल तात्पुरता बंद ठेवण्यात येणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# ठाण्यातील सेंट्रल मैदानासाठी खेळाडूंचे आंदोलन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ठाण्यातील प्रसिद्ध सेंट्रल मैदानात टेनिस क्रिकेट खेळणाऱ्यांवर अन्याय सुरु असून येथील 'स्पोर्टिंग क्लब ठाणे'कडून सेंट्रल मैदानात जाळी (नेट) बांधून व्यवसायिक पद्धतीने खेळण्यासाठी भाडे आकारले जात असल्याचा आरोप टेनिस क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंनी केला आहे. रविवारी मैदान वाचविण्यासाठी खेळाडूंनी आंदोलन देखील केले. तसेच आम्हाला खेळण्यासाठी जागा द्या अशी मागणी केली. कोर्टनाका येथील सेंट्रल मैदानात शेकडो क्रिकेटपटू आणि खेळाची आवड असणारे खेळण्यासाठी येतात. मैदानावर केवळ टेनिस खेळास परवानगी देण्यात आली होती. मागील काही महिन्यांपासून टेनिस क्रिकेट खेळण्यासाठी येणाऱ्यांना येथे अडवणूक केली जात असल्याचा आरोप येथील टेनिस क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंनी केला आहे. स्पोर्टिंग क्लबकडून येथे खेळण्यासाठी नेटचे दर महिन्याल हजारो रुपये भाडे आकारले जात असून अशा १६ नेट येथे बसविण्यात आल्याचा आरोप टेनिस क्रिकेट खेळाडूंनी केला आहे.

## उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर प्रभाग समिती क्र.१, सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, गोल मैदान, उल्हासनगर-१, दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०१३९**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.उमपा/प्र.स.१/वृक्ष छाटणे/६६/२०२६ दिनांकः १६/०२/२०२६**

### नोटीस

**(महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८ (३) अन्वये)**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात प्रभाग समिती क्र. १ चे हद्दीत खाली नमुद केलेल्या ठिकाणी वृक्ष तोडणेसाठी व छाटण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर ठिकाणी असणारी झाडे तोडणे करीता मंजुरी मिळणेकामी प्रस्ताव वृक्ष अधिकारी तथा सहायक आयुक्त, प्रभाग समिती क्र.१ यांनी वृक्ष प्राधिकरणाच्या सभेपुढे ठेवण्याचे योजिले आहे.

| अनु. | अर्जदाराचे नांव | ठिकाण | झाडाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | एस.ई.एस. इंग्लिश मिडीयम स्कुल | २४ नंबर शाळेच्या बाजुला, पोस्ट ऑफीस जवळ, उल्हासनगर - १ | १. वड जातीचे झाड, बुंधा अंदाजे ३ फुट, उंची अंदाजे २५ ते ३० फुट फांद्या विस्तारीत १, वय अंदाजे ८ ते १० वर्ष<br>२. गुलमोहर जातीचे झाड, बुंधा अंदाजे २ फुट, उंची अंदाजे २० ते २५ फुट, फांद्या विस्तारीत १ वय अंदाजे ४ ते ५ वर्ष<br>३. गुलमोहर जातीचे झाड, बुंधा अंदाजे ४ फुट, उंची अंदाजे २५ ते ३० फुट, फांद्या विस्तारीत २ वय अंदाजे ८ ते १० वर्ष |
| २ | श्री. चंद्रकिशोर जुगल झा | सी ब्लॉक ७८, सेंच्युरी रेयॉन हाऊसिंग प्ले ग्राऊंड, रामनगर, उल्हासनगर - ३ | १ फणस जातीचे झाड, बुंधा अंदाजे २ ते ३ फुट, उंची अंदाजे २० ते २५ फुट फांद्या विस्तारित वय अंदाजे २५ ते ३० वर्ष |
| ३ | श्री. विजय केसुमल मंधवानी | हिंदुस्तान गल्ली, सोनारा हॉल जवळ, उल्हासनगर - २ | १ पिंपळ या जातीचे झाड, बुंधा अंदाजे ६ ते ७ फुट, उंची अंदाजे ३० ते ३५ फुट फांद्या विस्तारीत ६ वय अंदाजे २० ते २५ वर्ष |
| ४ | श्री. स्वप्निल सुनिल हटेकर, ब्रम्ह कुमारी पीस पार्क, माताजी मंदिर जवळ, गोल मैदान, उल्हासनगर - २ | ब्रम्ह कुमारी पीस पार्क, माताजी मंदिर जवळ, गोल मैदान, उल्हासनगर - २ | १ जंगली जातीचे झाड, बुंधा अंदाजे २ ते ३ फुट, उंची अंदाजे २० ते २५ फुट फांद्या विस्तारीत वय अंदाजे १० ते १२ वर्ष |
| ५ | श्री. नितीन चिंतामणी सोनावणे | शहाड फाटक, शिवाजी रोड, आनंद विद्यालयाच्या पाठीमागे, किशोर मेडिकल, उल्हासनगर -१ | १ इलायती चिंच जातीचे झाड, बुंधा अंदाजे ३ ते ४ फुट उंची अंदाजे २० ते २२ फुट फांद्या विस्तारित वय अंदाजे १० ते १५ वर्ष |
| ६ | श्री. मनोज टाक | पॅराडाईज बिल्डींग, शहाड फाटक, स्टेशन रोड, उल्हासनगर - १ | १ इलायती चिंच जातीचे झाड, बुंधा अंदाजे १ ते २ फुट उंची अंदाजे २५ ते ३० फुट फांद्या विस्तारित वय अंदाजे १० ते १२ वर्ष |

उक्त नमुद केलेल्या ठिकाणी असलेले वृक्ष फांद्या छाटणेसाठी कोणत्याही इसमाची हरकत आल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात दिनांक २४/०२/२०२६ पूर्वी सहायक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी प्रभाग समिती क्र.१, गोल मैदान, उल्हासनगर-४२१००१ या कार्यालयात सादर करावी. मुदतीत लेखी हरकत प्राप्त झाल्यास संबधितास सुनावणी देऊन अंतीम निर्णय घेतला जाईल, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास प्रस्तुत प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**जावक क्रमांक**
**उमपा (पीआरओ / ५४६/२०२६**
**दिनांक : १६/०२/२०१६**

**सही/-**
**(अजय साबळे)**
**वृक्ष अधिकारी तथा सहायक आयुक्त**
**प्रभाग समिती क्र. १ उल्हासनगर महानगरपालिका**

# योग्य नियोजन व शिस्तबद्ध कारभारामुळे अद्याप करवाढ नाही – वनमंत्री गणेश नाईक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

**ठाणे :** नवी मुंबई शहराचे सुनियोजित विकास आराखडे, प्रशासनाचा शिस्तबद्ध कारभार आणि नागरिकांचे सक्रिय सहकार्य यामुळे आजपर्यंत नवी मुंबईत कोणतीही करवाढ करण्यात आलेली नाही, असे स्पष्ट प्रतिपादन वनमंत्री गणेश नाईक यांनी केले. नवी मुंबईत नुकत्याच पार पडलेल्या एका कार्यक्रमात घेतलेल्या मुलाखतीदरम्यान त्यांनी हे मत मांडले.



मुलाखतीत त्यांना, "नवी मुंबईत इतर शहरांच्या तुलनेत करवाढ होत नाही, मग पालिकेचा कारभार कसा चालतो?" असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना गणेश नाईक म्हणाले की, सन २००० साली निवडणुकीच्या काळात त्यांनी नवी मुंबईच्या जनतेला स्पष्ट शब्द दिला होता की, पुढील २० वर्षे घरपट्टी व पाणीपट्टी वाढवली जाणार नाही. त्या शब्दाला ते ठाम राहिले असून, गेल्या वीस वर्षांत नवी मुंबईत कोणतीही करवाढ करण्यात आलेली नाही. आगामी काळातही पुढील २० वर्षे घरपट्टी व पाणीपट्टी वाढू देणार नाही, हा माझा शब्द आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

### ■ नवी मुंबईला विकासाचा नैसर्गिक वरदान

गणेश नाईक यांनी नवी मुंबईच्या आर्थिक व तांत्रिक प्रगतीवरही भाष्य केले. नवी मुंबई हे परमेश्वराच्या आशीर्वादाने लाभलेले शहर असल्याचे त्यांनी नमूद केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील डेटा सेंटर्सबाबत माहिती घेतली असता, भारताचा मोठा डेटा परदेशात — हाँगकाँग, बँकॉक, सिंगापूर व चीनमध्ये — असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर हा डेटा पुढील पाच वर्षांत भारतातच आणण्याचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयानुसार डेटा सेंटरसाठी नवी मुंबई आणि चेन्नई या दोन शहरांची निवड करण्यात आली. सध्या नवी मुंबईत सुमारे पाच लाख कोटी रुपयांची डेटा सेंटर गुंतवणूक असून, चेन्नईतही तेवढीच गुंतवणूक आहे. उर्वरित पाच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक देशातील अन्य शहरांमध्ये विभागली गेली आहे.

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सूचना**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात "**जनपथ दुरुस्ती, सार्वजनिक संडास मुताऱ्या दुरुस्ती व इमारत दुरुस्ती** "या लेखाशीर्षका अंतर्गत (१) दिवा प्रभाग समिती मधील प्र. क्र.२७ व २८ मधील जनपथ दुरुस्ती करणे, (२) दिवा प्रभाग समिती मधील प्र. क्र.२७ व २८ मधील सार्वजनिक शौचलयांची दुरुस्ती करणे व (३) दिवा प्रभाग समिती मधील प्र. क्र.२७ व २८ मधील ठा.म.पा. बालवाडीची आवश्यक दुरुस्ती करणे अशा एकुण ३ कामांकरीता ऑनलाईन इ - निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https:://mahatenders.gov.in वर दि.१७.२.२६ ते दि.२४.२.२६ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा संकेतस्थळ वर दि .२४.२.२६ रोजी पर्यंत सायं. १६: ०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि.२५.२.२६ सायं. १२.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-दि. प्र.स/११९४/२०२५-२६
दि:१६.०२.२०२६

**सही/-**
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site www.thanecity.gov.in**

**मालमत्ता कर वेळेत भरा...कारवाईची अप्रिय घटना टाळा !**

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

ठाणे ■ मंगळवार
17 फेब्रुवारी 2026
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# ठाणे कोस्टल रोडच्या पहिल्या टप्प्याचे काम वेगात

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

**मुंबई :** ठाणे कोस्टल रोडच्या पहिल्या टप्प्याचे काम वेगात सुरू असून अवघ्या आठ महिन्यांत उन्नत मार्गाच्या पायाभरणी कामांपैकी ५० टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाले आहे. सध्या या प्रकल्पात पिअर कॅप तसेच आय-गर्डर उभारणीचे काम प्रगतीपथावर असून, हा टप्पा पूर्ण झाल्यानंतर ठाणे व परिसरातील वाहतुकीला मोठी चालना मिळणार असल्याचे सांगण्यात येत आहे. ठाणे कोस्टल रोडचा पहिला टप्पा सुमारे १३.४५ किमी लांबीचा असून हा सहा-लेन, प्रवेश-नियंत्रित ग्रीनफिल्ड मार्ग आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर करून या मार्गाची उभारणी करण्यात येत असून, वाहतूक सुरळीत आणि जलद करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. या प्रकल्पात देशात प्रथमच ग्रीनफिल्ड रस्ता प्रकल्पासाठी जमिनीवर मोनोपाइल फाउंडेशनसह सिंगल-पाइल, सिंगल-पियर प्रणाली वापरण्यात येत आहे. या प्रणालीमुळे जागेचा कमी वापर, अधिक मजबुती आणि दीर्घकालीन टिकाऊपणा साध्य होणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

ठाणे, मुंबई आणि आसपासच्या उपनगरांमधील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता ठाणे कोस्टल रोड प्रकल्प भविष्यातील दळणवळणासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. प्रकल्प वेळेत पूर्ण झाल्यास प्रवासाचा वेळ कमी होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# संकल्प संस्था आयोजित सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** संकल्प संस्था आयोजित सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गातील विद्यार्थ्यांसाठी दोन दिवसीय निवासी विशेष शिबिर संकल्प संस्थांचे अध्यक्ष विनोद हिवाळे यांच्या पुढाकाराने मुक्ताई फार्म हाऊस बदलापूर या ठिकाणी नुकतेच पार पडले. या शिबिराचे समन्वयक म्हणून सविता हेंडवे, वनिता सावंत आणि दीपा गमरे यांनी कामकाज पाहिले.



संकल्प संस्था वस्ती पातळीवर काय काम करते संस्थेची स्थापना, संस्थेची कार्यप्रणाली याची माहिती व संकल्प संस्थेचे विजन, मिशन, मूल्य काय आहे याबाबत शिबिरात माहिती देण्यात आली. या विशेष शिबिराचा उद्देश सामाजिक कार्यकर्ता स्वतःसाठी वेळ देत नाही, परंतु समाजासाठी नेहमीच तत्पर असतात खुप काही जबाबदारी असल्याने व्यस्त असतात त्यांच्या मागे नेहमीच्या धावपळीचा जीवनातून स्वतःसाठी वेळ देऊ शकत नाही. असा कार्यकर्ता नवचैतन्य निर्माण करण्यासाठी निसर्ग रम्य ठिकाणी आपणं कोण आहोत, आपले जीवन किती महत्वाचे आहे आपले सुध्दा मन आहे, भावना आहेत आपल्याला देखिल काही ना काही आवडत असतं याचे आत्मचिंतन करण्यासाठी या दोन दिवसीय शिबिराचे नियोजन करण्यात आले होते.

संकल्प संस्थेचे अध्यक्ष विनोद हिवाळे यांनी स्वपरिचय, मी कोण आहे, माझी भुमिका काय आहे, माझी जवाबदारी काय आहे, आत्मपरीक्षण, संवाद कौशल्य गटकार्य व समुपदेशनाचे टप्पे, एकमेकांबद्दल सहानभूती, आत्मविश्वास, सामाजिक कार्यकर्त्याची भूमिका आणि दृष्टिकोन, व्यक्तिगत प्रक्रिया या विषयावर विविध खेळाच्या (ॲक्टिव्हिटीज) माध्यमातून साध्या सोप्या पद्धतीने मांडणी केली. या शिबिरात प्रत्येक विद्यार्थ्याला आपले सुप्त गुण दाखवण्याची संधी मिळाली. उपस्थित विद्यार्थ्यांनी या दोन दिवसीय कार्यशाळा मध्ये खूप छान प्रतिसाद दिला.

आपले सुख तर आपण नेहमीच कोणाला तरी सांगत असतो परंतु आपल्या जीवनात दुःख असतात ते कुठे सांगू शकत नाही पण संकल्प संस्थेनी ॲक्टिव्हिटीच्या माध्यमातून आपले मन हलके करण्यासाठी चांगली संधी उपलब्ध करून दिली असे विद्यार्थ्यांनी यावेळी सांगितले. सर्वांनी आपले मन या शिबिरात हलके केले तसेच आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या आवडणाऱ्या गोष्टी आणि त्यांनी थोडी सुधार करण्याची गोष्ट या विषयावर ऐका खेळाच्या माध्यमातून गटामध्ये संवाद साधण्याचा प्रयत्न शिबिरात करण्यात आला.

# आजपासून आरटीई प्रवेश १० मार्चपर्यंत संधी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

**मुंबई :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत (आरटीई) दुर्बल व वंचित घटकातील बालकांसाठी स्वयं अर्थसहाय्यित व विना अनुदानित शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. पालकांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया १७ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत https://student.maharashtra.gov.in/adm_portal या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रक्रियेबाबत सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्याची माहिती शालेय शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी दिली.

## ऑनलाईन प्रवेशासाठी मार्गदर्शक सूचना

आरटीई अंतर्गत दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित/विना अनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली किंवा पूर्वप्राथमिक स्तरावर २५ टक्के प्रवेशासाठी पालकांनी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. वंचित घटकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), (क), (ड), इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटक, एचआयव्ही बाधित किंवा प्रभावित बालके, अनाथ, दिव्यांग तसेच कोविड प्रभावित बालकांचा समावेश होतो. आर्थिक दुर्बल गटात वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या पालकांच्या बालकांचा समावेश आहे.

पालकांना त्यांच्या निवासस्थानापासून एक किमीपेक्षा कमी (हवाई अंतर) असलेल्या शाळा आरटीई पोर्टलवर दर्शविण्यात येतील. प्रवेश प्रक्रियेसाठी विचारपूर्वक १० शाळांची निवड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे जोडणे, अचूक माहिती भरणे आणि विहित मुदतीत परिपूर्ण अर्ज सादर करण्याची दक्षता घ्यावी. प्रवेश प्रक्रियेदरम्यान अडचणी आल्यास आरटीई पोर्टलवरील मदत केंद्रांशी संपर्क साधून समस्यांचे निराकरण करता येईल, असे शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे.

# सनातन संस्थेच्या ग्रंथ प्रदर्शनला खा. श्रीकांत शिंदे यांची सदिच्छा भेट

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** ठाणे जिल्ह्यात मोठ्या उत्साहात महाशिवरात्री उत्सव साजरा करण्यात आला. डोंबिवली येथील पिंपळेश्वर महादेव मंदिर येथे सनातन संस्थेच्या ग्रंथ प्रदर्शनला सदिच्छा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि आमदार राजेश मोरे यांनी भेट देऊन ग्रंथांविषयी जाणून घेतले. ठाणे येथे १३ ठिकाणी, डोंबिवली येथे १० ठिकाणी, कल्याण येथे १ ठिकाणी, बदलापूर येथे ३ ठिकाणी, आणि अंबरनाथ येथे १ ठिकाणी, असे ग्रंथप्रदर्शन अन विक्री केंद्र जिल्ह्यात उभारण्यात आली होती. जिल्ह्यातील ठाणे येथ कौपिनेश्वर मंदिर, खिडकाळेश्वर मंदिर, अंबरनाथ येथील शिव मंदिर आणि



अन्य मंदिरांमध्ये पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. बऱ्याच ठिकाणी महाशिवरात्रीनिमित्त पुजांचे आजोजन करण्यात आले होते. सनातन संस्थेच्यावतीनेही महाशिवरात्रीनिमित्ताने ठाणे जिल्ह्यात २८ ठिकाणी ग्रंथ प्रदर्शनाच्या माध्यमातून व्यापक धर्मप्रसार करण्यात आला. ठाणे येथील ग्रंथ प्रदर्शनाला भाजपचे आमदार संजय केळकर यांनी भेट दिली त्यांनी मुंबई येथे होणाऱ्या सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाविषयी माहिती जाणून घेतली. जिल्ह्यातील प्रदर्शनाला मोठ्याप्रमाणात नागरिकांचा प्रतिसाद मिळाला.

# महाशिवरात्री निमित्त पाचवामैल गजबजले

## दिवसभरात एक लाखाच्या आसपास भक्तांनी घेतला लाभ!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**संजय कांबळे ● दि.16**

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील कांबा ग्रामपंचायत हद्दीत व कल्याण मुरबाड महामार्गावर तसेच उल्हास नदीच्या काठावर वसलेल्या श्री क्षेत्र सिध्देश्वर मंदिर पाचवामैल येथे महाशिवरात्री निमित्ताने शिवभक्तांनी अभूतपूर्व गर्दी केली होती, यावेळी मंदिराच्या बाजूलाच देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष देवराम सुरोशी यांच्या वतीने मोफत विस्तीर्ण पार्किंग केल्यामुळे वाहतूक कोंडी झाली



नाही. शिवशंभो, जयभोले, म्हणत भक्तांनी मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी रांग लावली होती. दिवसभर सुमारे एक लाखाच्या आसपास भक्तांनी दर्शनाचा लाभ घेतल्याचे सांगण्यात आले. उल्हास नदीच्या तीरावर नैसर्गिक अशा शांत वातावरणात श्री क्षेत्र सिध्देश्वर मंदिर वसलेले आहे, प्रशस्त जागा, विस्तीर्ण सभामंडप, नदीकिनारी घाट, यामुळे येथे वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम सुरू असतात, परंतु महाशिवरात्री दिवशी दरवर्षी येथे मोठ्या उत्साहात यात्रा भरते, याही वेळी महाशिवरात्री ला मोठी यात्रा भरली, कांबा गावचे उद्योजक मधुकर शिरोसे यांच्या वतीने मंदिरापासून जवळच विस्तीर्ण जागेत मोफत पार्किंग व्यवस्था करण्यात आली होती. मंदिराच्या दोन्ही बाजूला विविध वस्तूंचे स्टॉल लागले होते, संस्कार उपयोगी वस्तू, खेळणे, पाळणे, सौदर्य प्रसादणे, आयस्क्रिम चे गाडे, इत्यादींचा समावेश होता, मंदिर परिसरात विविध भजनी मंडळाकडून हरिपाठ, भजन, किर्तन, चे आयोजन करण्यात आले होते, यामुळे मंदिर ठिकाणी भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

मंदिर ट्रस्ट चे अध्यक्ष देवराम शिरोसे, स्वतः उपस्थित राहून गोष्टींवर लक्ष देत होते, तर जनार्दन महाराज संते, दुंदा महाराज म्हसकर, उमेश गायकर, महेश भगत, कल्पेश चौधरी, दिनकर पावशे, प्रभाकर पावशे, इत्यादी नी भजन, किर्तनाची जबाबदारी पार पाडत होते. कल्याण तालुका पोलीस ठाण्याच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता, दिवसभरात १लाखाच्या आसपास शिवभक्तांनी दर्शनाचा लाभ घेतला.तर विविध मंडळांनी अल्पोपहार ची व्यवस्था केली होती. परिसरातील म्हारळ, वरप, कांबा, पावशेपाडा, पाचवामैल, वाघेरापाडा, मानिवली, रायते, मांजर्ली, आणेभिसोळ, नांलिबी,गोवेली, घोटस ई,संतेचा पाडा, आदी गावातून लोक आले होते.



# अवघ्या एक रुपयात पंढरपूर यात्रा !

## वडवलीच्या सामाजिक बांधिलकी ग्रुपचा स्तुत्य उपक्रम

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुरबाड ● दिलीप पवार**

महाराष्ट्रातील वारकऱ्यांचे आराध्य दैवत म्हणजे पंढरीचा पांडुरंग. या पांडुरंगाला भेटण्याची ईच्छा तर प्रत्येकाची असते. पंढरीला जाऊन प्रत्यक्ष पांडुरंगाचे दर्शन घडले तर आयुष्याचे सार्थक होते. महाराष्ट्रातील थोर संतांनीही या पांडुरंगाची भक्ती व पायी वारीचे महत्व सांगितले आहे. म्हणून महाराष्ट्रातील वारकरी या विठ्ठल भेटीसाठी आसुसलेला असतो. मनी जायची ईच्छा असते परंतू सर्वानाच इथपर्यंत जाणे शक्य होत नसते.

मात्र मुरबाड तालुक्यातील वडवली येथिल सामाजिक बांधिलकी ग्रुपने यासाठी एक आगळा वेगळा उपक्रम सुरु केला असून गेले सहा वर्ष तब्बल तीनशे एक्कावन्न लोकांना फक्त नाममात्र १ रूपयात पंढरपूरची यात्रा घडवली जाते, व परत येत असताना जेजुरीचा खंडोबा व आळंदीला ज्ञानोबा माऊलींचे दर्शनही होत असते. सामाजिक बांधिलकी ग्रुपचे अध्यक्ष हभप गणपत (भाई )देऊ कराळे व सचिव तथा खरेदी विकी संघाचे संचालक अनंता (आण्णा ) शिंगोळे यांचा याकामी पुढाकार व आर्थिक नियोजन असते.

विशेष म्हणजे पंढरपूर मध्ये नेलेल्या वारकऱ्यांसाठी यावर्षी विशेष अशी लकी ड्रा सोडत काढली गेली असून बक्षिसांची खैरात केली आहे. यामध्ये महिलांसाठी ११ पेठण्या, १ सोन्याची नथ,१० बॅग, २ मोबाईल फोन, १ घड्याळ, मिक्सर, कुकर, स्वेटर अशा खास वस्तू लकी ड्रा जिंकलेल्या भक्तांना वाटप करून एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. तर ही यात्रा सुरळीत व निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी मंडळाचे सर्व सदस्य व ग्रामस्थ मंडळ वडवली यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# रस्ता रुंदीकरण की विद्यार्थ्यांची परीक्षा?

## 'युद्धपातळी'च्या कामामुळे अलिबाग–रोहा मार्गावर कोंडीचा कहर

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

**अलिबाग :** अलिबाग–रोहा मार्गाच्या नूतनीकरण व रुंदीकरणाचे काम 'युद्धपातळीवर' सुरू असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला, तरी प्रत्यक्षात या कामाचा फटका थेट परीक्षार्थी विद्यार्थ्यांना बसल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. बारावीच्या परीक्षेच्या दिवशीच या मार्गावर भीषण वाहतूक कोंडी झाली आणि अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर वेळेत पोहोचण्यासाठी अक्षरशः झुंज द्यावी लागली.

सकाळच्या सत्रातच रस्त्यावरील अपूर्ण कामे, अरुंद केलेले मार्ग, ठिकठिकाणी खोदकाम आणि अवजड वाहनांची गर्दी यामुळे वाहनांच्या रांगा अनेक किलोमीटरपर्यंत पसरल्या. परिणामी, काही विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र गाठण्यासाठी उशीर झाला, तर काहींना मानसिक तणावातच परीक्षा द्यावी लागल्याचे पालकांनी सांगितले.

या मार्गावरून दररोज अलिबाग, रोहा तसेच परिसरातील ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने विद्यार्थी प्रवास करतात. मात्र परीक्षा कालावधीतही कोणतेही नियोजन न करता रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू ठेवल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. "रस्ता महत्त्वाचा की विद्यार्थ्यांचे भविष्य?" असा संतप्त सवाल पालक व नागरिकांकडून केला जात आहे.

विशेष म्हणजे, परीक्षेच्या तारखा आधीच जाहीर असताना वाहतूक नियोजन, पर्यायी मार्ग, वाहतूक पोलिसांची नियुक्ती किंवा कामाला तात्पुरती स्थगिती देण्याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याचा आरोप होत आहे. प्रशासनाने केवळ 'काम युद्धपातळीवर सुरू आहे' असे सांगून जबाबदारी झटकू नये, अशी मागणी होत आहे.

परीक्षा काळात तरी अशा महत्त्वाच्या मार्गांवरील कामे थांबवावीत किंवा विद्यार्थ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी, अन्यथा प्रशासनाच्या निष्काळजीपणाची किंमत विद्यार्थ्यांच्या भवितव्याला मोजावी लागेल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

# अभिनेते राजपाल यादव यांना अंतरिम जामीन ■ पुढील सुनावणी 18 मार्चला

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

**चेक बाऊन्स प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने बॉलिवूड अभिनेता राजपाल यादव यांना अंतरिम जामीन मंजूर केला आहे. उत्तर प्रदेशातील शाहजहांपूर येथे १९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या भाचीच्या लग्नाला उपस्थित राहण्यासाठी अभिनेत्याने जामिनासाठी अर्ज केला होता.**

न्यायालयाने दिलेल्या माहितीनुसार, राजपाल यादव यांनी तक्रारदाराला १.५ लाख रुपये अदा केले आहेत. जामीन मंजूर करताना न्यायालयाने अभिनेत्याला त्यांचा पासपोर्ट (जर अद्याप जमा केला नसेल तर) न्यायालयात जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच १ लाख रुपयांचे जामीनपत्र व तितक्याच रकमेची हमी देणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासोबतच न्यायालयाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय देश सोडू नये, असे स्पष्ट आदेशही न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १८ मार्च रोजी होणार असून, त्या दिवशी राजपाल यादव यांनी प्रत्यक्ष न्यायालयात उपस्थित राहावे किंवा कामाच्या कारणास्तव शक्य नसल्यास व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे हजेरी लावावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

# वाशी, शिर्की खारेपाटात पाण्यासाठी 'धोंडबा' आंदोलन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण (प्रतिनिधी)**

**तालुक्यातील वाशी शिर्की खारेपाट भागातील जनतेच्या पाचविला पुजलेल्या प्रलंबित पिण्याच्या पाणी प्रश्नासाठी १८ फेब्रुवारी रोजी खारेपाट विभाग विकास संकल्प संघटनेच्या माध्यमातून पेण येथील महात्मा गांधी मंदीर ते पेण प्रांत कार्यालय येथे असंख्य महीला व पुरुषा सह धोडबा अंदोलन करण्यात येणार आहे.**

> हे आंदोलन, ही लढाई पाण्यासाठी,आपल्या आरोग्यासाठी आपल्या सुकर भविष्यासाठी , दररोज, मुबलक आणि शुद्ध पाण्यासाठी. आपल्या मूलभूत हक्कासाठी आहे. कोकणात एक पूर्वजांपासुन चालतआलेली प्रथा आहे की पाऊस पडला नाही किंवा पिण्याच्या पाण्याची कमतरता आली की येथील ग्रामस्थ रात्री अंगाला झाडे पाने लावुन गावभर नाचत गात धोंडबा काढत व त्या नंतर थोडे पाणी मंदिरात नेऊन ओततात. योगायोगाने किंवा दैवी चमत्काराने पाऊस पडायचा. म्हणून या अंदोलनाला धोंडबा अंदोलन नाव दिले आहे. कदाचित लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या मनात आले तर आमच्या खारेपाट भागातील ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करतील. ● **प्रकाश माळी , अध्यक्ष खारेपाट विकास संकल्प संघटना**

पेण तालुक्यातील वाशी-शिर्की खारेपाटातील जनता गेल्या आठ वर्षांपासून हेटवणे धरण हाकेच्या अंतरावर आसताना तीन दिवसा आड पाणी पुरवठा सहन करत आहे. या धरणातून पिण्याचे पाणी नवी मुंबईला २४ तास पुरवठा होतो आणी या धरणावर प्रथम आधिकार असलेल्या खारेपाट भागातील नागरिकांना मिळत नाही.आता यापुढे तेच पाणी खारेपाटाला सात दिवस आड मिळणार आहे. कोट्यवधी रुपये खर्चून योजना पूर्ण झाली, पाणी मुबलक आणि विपूल आहे, तरीही शेवटच्या गाव-वाड्यांमध्ये आजही पावसाचे साठवलेले अशुद्ध पाणी पिण्याची वेळ आहे. हेटवणे धरणात वाशी-शिर्की खारेपाटासाठी गरजे पेक्षा अडीचपट अधिक पाणी उपलब्ध आसुन सुद्धा दररोज पाणी न देता, पिण्याचे पाणी तीन दिवसांत विभागून दिले जाते.म्हणजे ही टंचाई नैसर्गिक नाही, तर नियोजनाच्या अभावातून निर्माण करण्यात आलेली कृत्रिम पाणी टंचाई आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांशी टिपू सुलतानची तुलना

# मराठा क्रांती मोर्चा आक्रमक, काँग्रेस प्रदेशाध्यक्षांकडून माफीची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १६**

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांशी टिपू सुलतान यांची बरोबरी केल्याच्या कथित वक्तव्यावरून राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या वक्तव्याच्या निषेधार्थ मराठा क्रांती मोर्चा आक्रमक झाला असून, मोर्चाचे समन्वयक महेश डोंगरे यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर तीव्र शब्दांत टीका केली आहे. डोंगरे यांनी प्रतिक्रिया देताना, सपकाळ यांनी तात्काळ काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देऊन जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली आहे. माफी न मागितल्यास राज्यात कुठेही फिरू देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. यासोबतच, वादग्रस्त वक्तव्याच्या निषेधार्थ केलेल्या आवाहनामुळे प्रकरण अधिक चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**दरम्यान, या प्रकरणावरून विविध सामाजिक व राजकीय संघटनांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भातील कोणतीही तुलना अस्वीकार्य असल्याची भूमिका अनेकांनी मांडली आहे. या वक्तव्यावर काँग्रेस पक्षाकडून अधिकृत भूमिका स्पष्ट होण्याची प्रतीक्षा असून, प्रशासनाकडूनही परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.**




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024